# वाल्मीकि रामायण

## डॉक्टर माधवराव चितळे यांची प्रवचने

सौ. प्रतिभा बोपर्डीकर, फेब्रुवारी ११, २०१७

नमस्कार मंडळी:

आपण सर्वांनी आकाशवाणीवर गीतरामायण ऐकले असेलच. रामायणाचा पगडा आपल्या समाजावर चांगलाच आहे.

इथे अमेरिकेत आल्यानंतर मेटुचन, न्यूजर्सीत आम्ही गुजराथी मित्रांसह "श्रीराम मंदीर" ही स्थापन केले आहे.

"रामायण" हे श्रीरामाभोवती फिरणारी एक कौटुंबिक कथा आहे - अशीच पुष्कळांची समजूत आहे.

तसेंच मागासलेल्या, जंगली अवस्थेत असणाऱ्या पुरातन भारतात घडलेली एक कथा असा परक्यांनी पसरवलेला भ्रम, अनेकांच्या मनांत असतो.

महर्षी वाल्मीकींचे संस्कृत भाषेतील रामायण हा सर्वात जुना प्रमाणभूत ग्रंथ आहे. हा ग्रंथ १००० छापील पृष्ठांचा आहे.

फारच थोड्या लोकांनी तो वाचला असेल. तरीपण सध्या अस्तित्वात आहेत त्या गोष्टी वाल्मिकी रामायणात वर्णन केलेल्या आहेत.

अयोध्या नगरी, नाशिकजवळची पंचवटी, चित्रकुट पर्वत, पंपा सरोवर, इतकेच काय Satellite ने ही भारत आणि लंकेला जोडणारा "सेतू" खरोखरच होता हे सिध्द केले आहे. पं. नेहरुंनी आपल्या विमानाचे नाव "पुष्पक" विमान ठेवले होते - ते रामायणात आहे! रामराज्य निर्माण करावे असे म.गांधी म्हणत.

अलिकडेच रामावतार शास्त्रींनी श्रीरामाच्या दंडकारण्याच्या प्रवासाच्या वर्णनाप्रमाणे, प्रवासकरुन तो नकाशाच प्रसिध्द केला आहे.

आजही श्रीलंकेत बुध्दमंदीरात बिभिषणाची विनम्र मूर्ती ठेऊन त्याला राष्ट्रीय पुरुष म्हणून सन्मान दिला गेला आहे. मारुतीची देवळे गावाच्या सुरवातीला, प्रवेश द्वाराजवळ, संत रामदासांच्या आग्रहाने बांधण्यात आली आहेत.

हे जरी खरे असले तरीही प्रचलित रामायणात बऱ्याच गोष्टींचा केवळ उडत उडत उल्लेख केलेला आहे. काही गोष्टींना गाळून टाकल्यासारखेच झाले आहे. श्रीरामाच्या शरयूनदी प्रवेशानंतर शुकशुकाट झालेली अयोध्यानगरी ऋषभु देव ह्या राजाने पुन: वसतीला आणली - ही आणि अशा कितीतरी कथा आपल्याला माहीत नाहीत. आपल्या मनात कुतुहल असले तरी आपण ते सोडून देतो. पण डॉ. माधवराव चितळे ह्यांनी त्यांत जास्त लक्ष घातले. डॉ. चितळे आपल्या सर्वांच्या परिचयाचे आहेतच. SSC त ते दुसऱ्या क्रमांकांने पास झाले. जग्गनाथ शंकर शेठ ही संस्कृतची Scholarship आणि मराठीचे सुवर्णपदक मिळवले. तसेच B.E. ला पुणे विद्यापिठात प्रथम आले. महाराष्ट्राचे Chief Engineer, दिल्लीला C.W.P.C. चे Chairman, अमेरिकेतील, न्यू जर्सीच्या Princeton University त “परवीन फेलो”, नोबेल प्राईझ सारखे “Water Laureate” १९९३ मधे - जगभर व्याखाने - आपणही त्यांचा इथे तेव्हा सत्कार केला होता. सध्या गंगा-शुद्धीकरण प्रकल्पावर नेमणूक - इतक्या कार्यात व्यस्त असूनही रामायणाचे कुतुहल त्यांना स्वस्थबसू देत नसे म्हणून मूळ संस्कृतमधले वाल्मिकी रामायण १९५८ साली काशीला जाऊन विकत घेतले. त्याचे भाषांतर उपलब्ध नाही. नोकरीत असताना, जगभर प्रवास करत असताना, सतत हा १००० पानांचा ग्रंथ ते जवळ बाळगत आणि सवड मिळेल तेव्हां ते संस्कृतचे श्लोक वाचून मनन करत असत. त्यांच्या लक्षात आले की, वाल्मीकींचे संस्कृत भाषेतील रामायण हा ऐतिहासिक दृष्टिनें सर्वात जुना प्रमाणभूत ग्रंथ आहे.

त्यातील सीता, तारा, सुग्रीव, अंगद, जटायू, हनुमान ही इतर व्यक्तिमत्वे सुद्धा उदात्त आणि ओजस्वी आहेत. सिरिअल मधल्या सध्याच्या स्त्रियांसारखी मुळुमुळू रडणारी सीता नाही, तर थेट रामाशी, लक्ष्मणाशी, धिटाईने वादंग घालणारी, तर रावणालाही निर्भयपणे खडसावणारी आहे. वानर व इतर विविध समाजांचा परिचय करुन देण्यात आला आहे. जटायूचा गृध्र समाज, गुहाचा निषाध समाज, चारण आणि विद्याधर समाज, वाल्मिकी समाज यांचे रितीरिवाज, संस्कृति, यांची माहिती आहे.

शस्त्रात्र संपन्न राक्षस समाज, त्यांचेजवळ असलेली विमानाची उपलब्धता वर्णन केली गेली आहे.

राक्षसी प्रवृत्ति कशा उत्पन्न होतात, वाढतात, पसरतात, त्यामुळे सर्वसाधारण समाजाला त्या कश्या त्रासदायक, भयावह ठरतात हे समाजशास्त्रीय दृष्टीने केलेले विश्लेषण विचारमग्न करते.

ह्या आतंकवादी, राक्षसी प्रवृत्तिचे क्रमश: खंडन करत, शेवटी आसुरी प्रवृत्तींचा पराभव करुन रामराज्य कसे स्थापन झाले हे स्पष्ट केले आहे. वायव्ये पासून ते बंगाल पर्यंत सुव्यवस्था निर्माण केली. पूर्वेच्या व्हिएटनाम पासून आफ्रिकेच्या घनदाट कांगो पर्यंतचा भूगोलाच्या वैशिष्ट्यांचे दर्शन आश्चर्यचकीत करणारे आहे. कृर आतंकवादावर विजय मिळवून सुस्थिर आणि भरभराटीचा समाज, “रामराज्य” कसे निर्माण झाले हे आज आपल्याला मार्गदर्शक ठरेल. रामराज्याच्या दिशेने भारताला वाटचाल करायची असेल तर कोणत्या नीतिमुल्यांचा पाठपुरावा करावा लागेल, व्यवहार कुशलतेचा अवलंब करावा लागेल हे “रामायण” वाचून समजू शकेल.

ही सारी कौटुंबिक, सामाजिक उद्दिष्टे आजच्या आधुनिक पिढीला स्पष्ट व्हावीत म्हणून डॉ. माधव चितळे यांनी औरंगाबादच्या बालाजी मंदिरात २००४ ते २००९ ह्या पांच वर्षभर सतत ८८ प्रवचने केली.

वाल्मिकी जयंती, कोजागिरी पौर्णिमेच्या दिवशी २००९ साली औरंगाबादच्या वाल्मिकी समाजाच्या पुढाऱ्यांचा सत्कार करुन समारोप केला. तेव्हा सर्व मंडळी भारावून गेली होती. ह्या सर्व प्रवचनांच्या CDs तेथल्या धार्मिक समितीतर्फे करण्यात आल्या. ह्या प्रवचनांचे, CDs चे लिखित स्वरूप शब्दांकन होऊन वाचकांना मननासाठी ग्रंथरूपात उपलब्ध व्हावे अशी सारखी मागणी सुरु झाली. तेव्हा सौ. आशा देवधर यांनी बरेच वर्षे मेहनत घेउन त्याचे संपादन केले, शब्दांकन केले आणि नुकतेच जून २०१६ मधे ७४४ पृष्ठांचे हे पुस्तक साकेत प्रकाशन औरंगाबाद - पुणे यांनी प्रकाशित केले.

Stockholm-Sweden येथे सुवर्ण महालात शेकडो तज्ञांनसमोर Water Laureate हे नोबेल प्राईझ सारखे पारितोषक डॉ. माधव चितळे यांना मिळाले, त्यापेक्षाही प्रत्यक्ष वाल्मिकी समाजासमोर, बालाजी मंदिरात “माधव बुवा” प्रवचनकार ही पदवी त्यांना मिळाली ही जास्त महत्वाची आहे असे मला वाटते.

हे पुस्तक म्हणजे माय मराठी - साहित्याला, सरस्वतीला अर्पण केलेला एक अतिशय तेजस्वी हारच आहे! आपण सर्वांनी हे पुस्तक संग्रही ठेवावे असे आग्रहाने म्हणावेसे वाटते!